# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:17.10.2025** **वार:शुक्रवार**

1. स्वदेशी बनावटीच्या तेजस लढाऊ विमान निर्मिती प्रकल्पाचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज नाशिकमध्ये लोकार्पण
2. कौशल्य विकासाच्या माध्यमातून समर्थ भारताची उभारणी करण्याचं संरक्षण मंत्र्यांचं आवाहन
3. महाराष्ट्राला संरक्षण तंत्रज्ञानाचं केंद्र बनवणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
4. दीपावलीच्या प्रकाशोत्सवाला आज वसूबारसेपासून प्रारंभ आणि
5. नैऋत्य मौसमी पावसाची संपूर्ण देशभरातून माघार

**राजनाथ सिंह-नाशिक**

देशाच्या संरक्षण सामर्थ्याचं प्रतिक असलेल्या स्वदेशी बनावटीच्या 'तेजस एमके-वन ए' या लढाऊ विमानाच्या निर्मिती प्रकल्पाचं लोकार्पण संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज नाशिकमध्ये होणार आहे. हिंदुस्तान एरोनॉटीक्स लिमिटेडच्या नाशिकच्या प्रकल्पात तयार झालेलं पहिलं तेजस लढाऊ विमान त्यांच्या उपस्थितीत आज सकाळी नाशिकमधून अवकाशात भरारी घेणार आहे. दरम्यान ओझर इथल्या हिंदुस्थान एरोनॉटीक्स लिमीटेड परिसरात साकारण्यात आलेल्या मिनी स्मार्ट टाउनशिपचं उद्घाटन राजनाथ सिंह यांच्या हस्ते काल झालं. या टाऊनशीपमध्ये हरित तंत्रज्ञान, डिजिटल पायाभूत सुविधा आणि समुदाय-केंद्रित सुविधांचा समावेश आहे.

**राजनाथ-पुणे**

सर्वांनी मिळून कौशल्याच्या माध्यमातून देशाला पुढे नेण्याची गरज आहे. असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी काल पुण्यात केलं. कौशल्य विकासाच्या माध्यमातून समर्थ आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीसाठी केंद्र सरकारसमवेत महाराष्ट्र राज्य शासन देखील कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या सुविधा उभ्या करत असून त्यांना प्रोत्साहनही देण्यात येत असल्याचं सिंग यांनी सांगितलं. पुण्यातल्या सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या सहाव्या पदवीदान समारंभात ते काल बोलत होते. यावेळी संरक्षण मंत्री म्हणाले....

**बुक्स में लिखा ज्ञान बुकि इस नौलेज मैं मानता हूँ तब तक अधूरा है, जब तक वो किसी काम में नहीं आता। इसलिए आज की शिक्षा का असली उद्देश्य यही होना चाहिए की जो सीखा है। उसे लाइफ लाइफ में एप्लाई कैसे करे आज भारत के लिए मेरे साथियों ये और भी महत्वपूर्ण हो जाता है। क्योंकि हम दुनिया के सबसे युवा देश है। आप सोचिए इतनी बड़ी यूथ पॉपुलेशन अगर सही दिशा में बढ़े और अगर आपके पास सही स्किल हो तो भारत को आगे बढ़ने से दुनिया की कोई ताकत हमें रोक नहीं सकती है। हमारी डेमोग्राफिक डिविडेंड तभी ताकत बनेगी जब हर युवा स्किल्ड और प्रोडक्टिव बनेगा और साथियों अगर हमारे पास स्किल नहीं है। इस दौड़ती हुई दुनिया में टिके रहना ये बहुत ही मुश्किल है। और अगर स्किल है दुनिया की कोई ताकत हमें आगे बढ़ने से रोक नहीं सकती है यह भी विश्वास आपके मन के अंदर होना चाहिए।**

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकात पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**मुख्यमंत्री**

यावेळी सिंबायोसिस स्कूल ऑफ डिफेन्स अँड एरोस्पेस टेक्नॉलॉजीचं उद्घाटनही करण्यात आलं. देश संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रात सातत्याने पुढे जात असताना महाराष्ट्राला संरक्षण तंत्रज्ञानाचे केंद्र बनविण्याचा प्रयत्न राज्य सरकार करत आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. येत्या काळात या क्षेत्रातील गुंतवणूक, उत्पादन आणि मनुष्यबळ निर्मिती राज्यात होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**अमित शहा**

देशाच्या संविधानावर विश्वास ठेवून हिंसाचार सोडून देण्याच्या नक्षलवाद्यांच्या निर्णयाचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कौतुक केलं आहे. गेल्या दोन दिवसांत महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये एकंदर 258 सशस्त्र नक्षलवाद्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडला असल्याचं अमित शहा यांनी समाज माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे. पुढच्या वर्षी मार्च अखेर देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करण्याच्या सरकारच्या संकल्पाचंच हे प्रतिबिंब आहे, असं शहा यांनी म्हटलं आहे.

**शिल्प-रत्नागिरी**

रत्नागिरीत उभारण्यात आलेल्या कोकणातल्या सहा भारतरत्नांच्या शिल्पांचं अनावरण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल झालं. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे तारांगणाच्या प्रांगणात ही शिल्पं उभारण्यात आली आहेत. ऐकुया याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून....

**निसर्गाच्या असलेल्या वरदहस्तामुळे कोकणाला देवभूमी म्हटलं जातं. तसंच, ही भूमी म्हणजे नररत्नांची खाण आहे. कोकणभूमीने देशाला सहा भारतरत्नं दिली असून, त्यांपैकी चार रत्नं रत्नागिरीशी संबंधित आहेत. महिलांचं शिक्षण आणि हक्क यांसाठी आयुष्यभर झटलेले महर्षी धोंडो केशव कर्वे दापोली तालुक्यातल्या मुरुडचे. महामहोपाध्याय डॉक्टर पांडुरंग वामन काणे यांचं मूळ गाव खेड तालुक्यातलं मोरडे हे असलं, तरी त्यांचा जन्म चिपळूण तालुक्यातला आणि त्यांचं प्राथमिक शिक्षण झालं दापोलीत. मंडणगड तालुक्यातलं आंबडवे हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं मूळ गाव, तर मास्टर ब्लास्टर म्हणून ओळखले जाणारे विक्रमवीर क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचं मूळ गाव लांजा तालुक्यातलं हर्चे. भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे रायगड जिल्ह्यातल्या गागोद्याचे, तर कोकणालाच लागून असलेल्या गोव्यातलं मंगेशी हे स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांचं मूळ गाव. या सर्व भारतरत्नांची शिल्पं रत्नागिरीतल्या तारांगणाच्या प्रांगणात उभारण्यात आली असून, मोडीत काढलेल्या वाहनांच्या सुट्या भागांपासून ती साकारण्यात आली आहेत. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे प्राध्यापक शशिकांत काकडे आणि विजय बोंदर यांच्या मार्गदर्शनाखाली 15 विद्यार्थ्यांनी नऊ महिने अहोरात्र कष्ट करून 25 टन 'ऑटोमोबाइल वेस्ट'पासून ही शिल्पं तयार केली आहेत. अशा प्रकारचा हा देशातला पहिलाच उपक्रम असून, त्यासोबत या व्यक्तिमत्त्वांची माहितीही दिली आहे. या शिल्पांमुळे रत्नागिरीच्या पर्यटन वैभवात भर पडली असून, ती शिल्पं नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**शिंदे-रत्नागिरी**

चिपळूण आणि रत्नागिरी शहरातल्या झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल रत्नागिरी इथे आढावा बैठकीत दिल्या. यावेळी त्यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानाची माहिती घेतली. पाच स्वयंसाह्यता समूहांना शिंदे यांच्या हस्ते कर्जवाटप करण्यात आलं. रत्नागिरी पोलीस दलाच्या नावीन्यपूर्ण उपक्रम दर्शवणाऱ्या फलकाचं अनावरणही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

**दीपावली**

दीपावलीच्या प्रकाश पर्वाला आज रमा एकादशी आणि गुरुद्वादशी म्हणाजेच वसूबारसच्या मुहूर्तापासून प्रारंभ होत आहे. गाय आणि वासराचे पूजन करून त्यांना औक्षण करून त्यांना गोड घास आज भरविण्यात येतो. दरम्यान दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठामध्ये उत्साहाचं वातावरण आहे.

**आठवले**

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल नागपूर इथे केंद्र सरकारच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत जिल्हा प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. दरम्यान खासगी क्षेत्रातही आरक्षण लागू करायला हवं असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल पुन्हा नागपुर इथे पत्रकार परिषदेत व्यक्त केलं. चंद्रपूर इथे धम्मदीक्षा अनुप्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमातही आठवले सहभागी झाले होते.

**निधी**

सोलापूर जिल्ह्यातील श्रीपूर इथल्या कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या वतीनं मुख्यमंत्री सहाय्यता निधीला एक कोटी रुपयांचा धनादेश देण्यात आला आहे. कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी यांनी ही माहिती दिली आहे.

**पाऊस**

नैऋत्य मान्सूनने काल संपूर्ण देशातून माघार घेतल्याचं भारतीय हवामान खात्यानं म्हटलं आहे. दरम्यान तामिळनाडू, पुद्दुचेरी, किनारी आंध्र प्रदेश, रायलसीमा, दक्षिण अंतर्गत कर्नाटक आणि केरळ-माहे इथून ईशान्य मान्सून सुरू झाला आहे. दरम्यान येत्या 24 तासात कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**अंगणवाडी भाऊबीज-कोल्हापूर**

कोल्हापूर जिल्ह्यातील 7 हजार 495 अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या बँक खात्यावर प्रत्येकी 2 हजार प्रमाणे 1 कोटी 49 लाख 90 हजार रुपये भाऊबीज रक्कम जमा करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या महिला आणि बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुजितकुमार इंगवले यांनी ही माहिती दिली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार